कायदेविषयक मार्गदर्शन मोफत
संपर्क
ॲड . सुशीला
मो नं 8766507294

RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

दि. 12 फेब्रुवारी 2026

1



संकलन प्रा. यशवंत दुपटे

शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६ | वर्ष : ६ | अंक : ४८ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Friday, 13 February 2026 | Year : 6 | Issue : 48 | Daily | Rate: Rs. 5/-

## महत्त्वाच्या बातम्या

### दूरदर्शनच्या सर्वात जुन्या निवेदिका सरला महेश्वरींचे निधन



**नवी दिल्ली :** दूरदर्शनच्या वृत्तनिवेदिका आणि अनुभवी अँकर सरला माहेश्वरी यांचं निधन झालं आहे. वयाच्या 71 व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. एक्स आणि फेसबुकसह सोशल मीडियावर ही बातमी पसरली आणि लोक त्यांच्या निधनाबाबत शोक व्यक्त करत आहेत. दूरदर्शननेही त्यांना आदरांजली अर्पण केली आहे. सरला माहेश्वारी या दीर्घकाळ दूरदर्शनमध्ये काम करत होत्या. त्यांचा आवाज, त्यांचं व्यक्तिमत्व आणि बातम्या वाचण्याची त्यांची पद्धत सगळंच एक खास प्रकारची छाप पाडणारं होतं. त्यांनी आपल्या वृत्तवाचनातून वाचकांना बातम्या पाहण्याची गोडी लावली होती. बातम्या वाचणारा आश्वासक चेहरा अशी त्यांची ओळख होती. आज हा चेहरा काळाच्या पडद्याआड गेला आहे.

### भारतात माहिती मिळवणे सोपे नाही : सर्वोच्च न्यायालय



**नवी दिल्ली :** माहितीचा अधिकार (आरटीआय) हे नागरिकांना सरकारकडून माहिती मिळविण्यासाठी एक महत्वाचे साधन आहे, परंतु पारदर्शकतेची पातळी सर्व संस्थांमध्ये एकसारखी नाही. केंद्रीय माहिती आयोगाच्या मते, 2024-25 मध्ये अनेक प्रमुख संस्थांनी मोठ्या प्रमाणात आरटीआय अर्ज नाकारले. केंद्रीय माहिती आयोगाच्या (सीआयसी) ताज्या वार्षिक अहवालानुसार, 2024-25 मध्ये अनेक प्रमुख सरकारी संस्थांनी मोठ्या संख्येने माहिती अधिकार (आरटीआय) अर्ज नाकारले. यापैकी दिल्ली उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय आणि गृह मंत्रालय हे सर्वोच्च नाकारणाऱ्यांमध्ये होते.

### स्थलांतरीत उसतोड कामगारांच्या मुलांसाठी 11 शासकीय वसतिगृहांना 159 कोटींचा निधी



**मुंबई :** स्थलांतरीत ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी संत भगवान बाबा शासकीय वसतिगृह योजनेंतर्गत बीड जिल्ह्यातील 11 वसतिगृहांच्या बांधकामासाठी 159 कोटी 36 लाख 60 हजार इतक्या रकमेच्या बांधकाम अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असल्याची माहिती उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली.

ऊसतोड कामगारांच्या मुलांची शिक्षणाबाबतची आस्था वाढीस लावून त्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग सुकर करण्यासाठी स्थलांतरित ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठी संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेंतर्गत राज्यातील ऊसतोड कामगारांची संख्या अधिक असलेल्या 41 तालुक्यांच्या ठिकाणी मुलांसाठी 41 व मुलीसाठी 41 अशी एकूण 82 (प्रत्येकी 100 विद्यार्थी क्षमता) शासकीय वसतिगृह सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रथम टप्प्यात मुलांसाठी 10 व मुलींसाठी 10 अशी एकूण 20 शासकीय वसतिगृहे सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या योजनेंतर्गत बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात 2 (मुलांचे 1 व मुलीचे 1) प्रत्येकी 100 विद्यार्थी क्षमता) अशी एकूण 22 शासकीय वसतिगृहे सुरु करण्यास सामाजिक न्याय विभागाच्या शासन निर्णयाद्वारे यापूर्वीच मान्यता देण्यात आली आहे. ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींनी शिकले पाहिजे, शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आले पाहिजे असे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे स्वप्न होते.त्यादृष्टीने त्यांनी प्रयत्न केले आणि या मुला- मुलींसाठी वसतिगृह बांधण्यासाठी पाठपुरावा केला आणि ते पालकमंत्री असताना अनेक ठिकाणी जागाही निश्चित करण्यात आल्या होत्या.सारथी संस्थेच्यावतीने मराठा समाजातील मुलांसाठी विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी बांधण्यात येणाऱ्या वसतिगृहांच्या धर्तीवर बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी वसतिगृहांचे दर्जेदार बांधकाम करावे अशा सूचना दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंत्यांना वेळोवेळी दिल्या होत्या, अशी माहितीही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली.

# औरंगाबाद येथे कामगार संयुक्त कृती समितीचे महाधरणे आंदोलन

**औरंगाबाद :** एकूण 29 कामगार कायदे मोडीत काढून, केंद्रीय भाजप सरकारने नव्याने बनवलेले चार कामगार संहिता रद्द करा. आधिचेच कामगार कायदे लागू करा. व्ही बी जी ग्राम जी कायदा रद्द करा. महाराष्ट्रातील जनसुरक्षा कायदा रद्द करा. माथाडी कायद्यात बदल रद्द करा ई. मागण्यांसाठी आज देशव्यापी संपाचा एक भाग म्हणून छत्रपती संभाजीनगर औरंगाबाद येथे कामगार संयुक्त कृती समितीच्या वतीने क्रांती चौक येथे महाधरणे आंदोलन - संप केला. या आंदोलनात मराठवाडा लेबर युनियन, हमाल मापाडी महामंडळ, सीपीआय, सीपीएम, सिटू, काँग्रेस, आयटक, इंटक, आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका, कामगार संघटना, भारतीय कामगार सेना, बीएसएनएल, स्मार्ट मिटर विरोधी कृती समिती, लालबावटा यूनियन, लालनिशान पार्टी, विमा कर्मचारी संघटना, राज्य कर्मचारी संघटना, एल. आय. सी. ई. संघटना, यूनियन, संस्था, व्यक्ती यांचा शेकडोंच्या संख्येने सहभाग होता. आंदोलन स्थळी भरवण्यात आलेल्या सभेच्या अध्यक्षस्थानी हमाल मापाडी महामंडळाचे नेते सुभाष लोमटे होते. या प्रसंगी ॲड. सुभाष सावंगीकर, मराठवाडा लेबर युनियन जनरल सेक्रेटरी यांच्यासह सीपीआय चे




कॉ. राम बाहेती, बीएसएनएल चे रंजन दाणी, अखिल भारतीय दलित पत्थर चे रमेशभाई खंडागळे, सिपीएम चे भगवान भोजने, लक्ष्मण साक्रूडकर, राज्य सरकार कर्मचारी देविदास जरारे, वानखेडे, बॅंक कर्मचारी देविदास तुलजापूरकर, उमेश कुलकर्णी यांच्यासह उपस्थित सर्व संघटना, यूनियन, संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची भाषणे झाली. शेवटी असंघटित कष्टकऱ्यांचे नेते साथी सुभाष लोमटे यांनी अध्यक्षीय समारोप केला. शिष्टमंडळाने राष्टपती महोदया याना जिल्हाधिकारी यांच्या मार्फत सविस्तर निवेदन पाठवले. शिष्टमंडळात सर्वश्री ॲड. सुभाष सावंगीकर, कॉ. बुद्धिनाथ बराळ, मंगला ठोंबरे, रंजन दाणी, अभय टाकसाळ यांचा समावेश होता.

### हा भारत बंद नव्हे तर केरळ बंद : शशी थरुर

आज देशभरात केंद्रीय कामगार संघटनांनी 'भारत बंद'ची हाक दिली. या केंद्रीय कामगार संघटनांनी संयुक्तपणे भारत बंदचे आयोजन केलं. या भारत बंदला अनेक शेतकरी संघटनांनीही पाठिंबा दिला. दरम्यान शशी थरुर यांनी हा भारत बंद नसून केरळ बंद आहे असं वक्तव्य केलं आहे.शशि थरुर यांनी त्यांच्या पोस्टमध्ये लिहिलं आहे की ही बाब खेदाने नोंदवावी लागते आहे की आजचा भारत बंद हा खऱ्या अर्थाने केरळ बंद आहे. केरळमध्ये बंद पाळण्यात आला आहे. मी जेव्हापासून राजकारणात आलो आहे, मी माझी भूमिका बदललेली नाही. मी विरोध करण्याच्या अधिकाराला पाठिंबा देतो, पण खोडा घालण्याच्या अधिकाराच्या समर्थनात मी नाही.

## रेरा कायदा सामान्यांसाठी की बिल्डरांच्या फायद्यासाठी?




**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी एका सुनावणी दरम्याने रिएल इस्टेट रेग्युलेटरी अथॉरिटीच्या कार्यप्रणालीत कठोर शब्दात टीका केली आहे. कोर्टाने रेरा आता डिफॉल्टर बिल्डर्सना वाचवण्याचा मार्ग बनली आहे. यामुळे रेराला समाप्त करायला हवे. सुप्रीम कोर्टाचे मुख्य न्यायमपूर्ती सुर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमालिया बागची यांच्या खंडपीठाने सुनावणी दरम्यान कठोर शब्दात रेराच्या कारभारावर टीका केली आहे. सर्व राज्यांनी आता याचा गंभीरपणे विचार करायला हवा की अखेर रेरा संस्थेची स्थापना अखेर कशासाठी केली होती ? हा कायदा सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या रक्षणासाठी आणला होता की बिल्डर्सच्या सुरक्षेसाठी हा कायदा आणला होता ? असे न्यायमूर्तींनी सुनावले. मुख्य न्यायमूर्ती सुर्यकांत यावर टीप्पणी करताना म्हणाले की, 'डिफॉल्टर बिल्डर्सना सुविधा देण्याशिवाय ही संस्था आणखी काही करु शकत नाही. त्यामुळे या कायद्याला संपूर्णपणे समाप्त करणेच चांगले होईल' सर्वोच्च न्यायालय रेरा कायद्यावर केलेली टीप्पणी ही सुप्रीम कोर्टात हिमाचल प्रदेशातील एका प्रकरणा दरम्यान केली. हिमाचल प्रदेशातील रेराचे कार्यालय सिमला हून धर्मशालात शिफ्ट करण्याचे नोटीफिकेशन हिमाचल सरकारने काढले होते. या प्रकरणाच्या विरोधात अपिल दाखल करण्यात आले होते आणि हे प्रकरण हिमाचल प्रदेश हायकोर्टात पोहचले. गेल्यावर्षी हायकोर्टाने राज्य सरकारचे हे नोटीफिकेशन रोखले होते. हायकोर्टाने म्हटले होते राज्य सरकाने हे रेरा कार्यालय शिफ्टींगचे नोटीफिकेशन पर्यायी जागेचा शोध घेण्याआधीच काढले होते.

## 3.25 लाख कोटी रुपयांच्या 114 राफेल विमानखरेदीवर शिक्कामोर्तब



**नवी दिल्ली :** केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालील संरक्षण अधिग्रहण परिषदेने (DAC) गुरुवारी तिन्ही सशस्त्र दलांसाठी विविध अधिग्रहण प्रस्तावांना मंजुरी दिली. उच्च अधिकाऱ्यांनी माहितीनुसार, यामध्ये फ्रान्सकडून 114 राफेल लढाऊ विमाने खरेदी करण्याच्या कराराचाही समावेश आहे.

संरक्षण अधिग्रहण परिषदेने अमेरिकेकडून सहा पी-8आय सागरी देखरेख आणि पाणबुडीविरोधी युद्ध विमानांच्या खरेदीलाही मान्यता दिली आहे.

फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या 17 ते 19 फेब्रुवारी दरम्यान भारत दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्या भारत दौऱ्याच्या काही दिवस आधी ही मंजुरी देण्यात आली आहे. उच्च अधिकाऱ्यांनी सांगितले की, 114 राफेल लढाऊ विमानांपैकी 90 विमाने स्वदेशी पद्धतीने तयार करण्याची योजना आहे, ज्यामध्ये अंदाजे 50 टक्के स्वदेशी सामग्री असेल.

यापूर्वी भारतात उत्पादित होणाऱ्या विमानांमध्ये 30 टक्के स्वदेशी सामग्रीचा वापर करण्याची चर्चा झाली होती. पण अधिकाऱ्यांनी गुरुवारी सांगितले की, पुढील चर्चेत हे प्रमाण सुमारे 50 टक्क्यांपर्यंत वाढवले जाईल. शिवाय, विमानांवर भारतीय शस्त्रे आणि प्रणाली बसवण्याचे पूर्ण अधिकार भारताला असतील. व्यावसायिक वाटाघाटी पूर्ण झाल्यानंतर आणि सुरक्षा मंत्रिमंडळ समितीने अधिग्रहणाला मान्यता दिल्यानंतर अंतिम करारावर स्वाक्षरी केली जाईल. भारतीय हवाई दलाकडे आधीच 36 राफेल विमाने आहेत आणि भारतीय नौदल पुढील काही वर्षांत 26 राफेल एम विमाने वाहक ऑपरेशन्ससाठी समाविष्ट करेल. राफेल विमानांच्या खरेदीमुळे लॉजिस्टिक्स आणि प्रशिक्षण खर्च कमी होण्यास मदत होईल. संरक्षण अधिग्रहण परिषदेने अमेरिकेकडून सहा पी-8आय सागरी देखरेख आणि पाणबुडीविरोधी युद्ध विमानांच्या खरेदीलाही मान्यता दिली आहे. नोव्हेंबर 2019 मध्ये संरक्षण अधिग्रहण परिषदेने सहा पी-8आय विमानांच्या खरेदीला मान्यता दिली होती. त्यानंतर अमेरिकेच्या संरक्षण विभागाने एप्रिल 2021 मध्ये अंदाजे 2.42 अब्ज डॉलर्स किमतीच्या विक्रीला मान्यता दिली. पण हा करार आतापर्यंत होऊ शकला नाही. आता विमानाच्या किमतीत लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा आहे.

## अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील 5012 प्राध्यापक पद भरतीस मान्यता

**मुंबई :** राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्राला बळकटी देण्यासाठी आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांशी संलग्न असलेल्या मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापक संवर्गातील 5 हजार 12 रिक्त पदे भरण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

मंत्री चंद्रकांत दादा पाटील म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार प्राध्यापकांची रिक्त पदे भरणे अनिवार्य होते. याच पार्श्वभूमीवर हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे

विद्यार्थी संख्येवर आधारित पदे दि.1 ऑक्टोबर 2025 रोजीच्या विद्यार्थी संख्येनुसार निश्चित झालेल्या कार्यभाराच्या आधारे ही 5,012 पदे भरली जातील. ही भरती प्रक्रिया विहित कालमर्यादेत आणि पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने राबवण्याची जबाबदारी उच्च शिक्षण संचालक (पुणे) आणि विभागीय सहसंचालकांची असेल.

## Public Notice

IN THE COURT OF 4th JOINTCIVIL JUDGE JUNIOR DIVISION NAGPUR

M. J.Case No. 1318/2025 Room No. 104

Fixed for. 2-3-2026

**Applicant.**

**1]** Kavita Sachin Bhandarwar
**2]** Janvhi Sachin Bhandarwar
**3]** Sushma Sudhidhar Bhandarwar
**4]** Shridhar Marotrao Bhandarwar

**---Versus---**

**Non- Applicants. Nil**

**Name of deceased.** 1] Sachin Shridhar Bhandarwar
Died On. 18/10/2014
R/o Plot No. 13 Ring Road. Central Excise Colony Wardha Road. Nagpur- 440015

Whereas Sachin Shridhar Bhandarwar Died On. 18/10/2014 Plot No. 13 Ring Rode. Central Excise Colony, Wardha Road. Nagpur- 440015 and Whereas Kavita Sachin Bhandarwar & Oth. has presented an application to Court for grant of Legal Heir Certificate Under the Bombay Regulation Act 1827.

This is to give notice to all persons who may dispute the right of the said Appliicants Kavita Sachin Bhandarwar & Oth. as Legal Heir of the deceased to appear in the Court of 4th Joint Civil Judge Junior Division. Nagpur on 2nd Day of March. 2026 at 10.30 A.M there to enter their objections and it is hereby declared that if no sufficient objections is offered on or before the date mentioned above, the Court will forthwith proceed to receive proof of the said Applicants right and to grant them. provided they shall apper entitled thereto a Certificate of Legal Heir of the said deceased.

Given under my hand and the seal of the court. 4th day of March, 2026.

**BY order of the Court**
Asstt. Supdr. [T.W]
civil judge Sr. Dn. Nagpur

# डॉ. आंबेडकर कॉलेजमधील प्रकरण तापले

## चौकशी समितीसमोर आंबेडकरी संघटनांचे निवेदन: जनआंदोलनाचा इशारा



**नागपूर :** डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर येथील एका महिला प्राध्यापिकेवरील कथित अन्यायाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने गठीत केलेली चौकशी समिती दि. 11 फेब्रुवारी 2026 रोजी महाविद्यालयात दाखल झाली. यावेळी काही आंबेडकरी सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी समितीसमोर निवेदन सादर करून निष्पक्ष चौकशीची मागणी केली. समितीचे अध्यक्ष डॉ. नितीन कोंगरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने महाविद्यालयात भेट दिली असता प्रतिनिधींनी कार्यकारी प्राचार्य डॉ. दीपा पान्हेकर यांच्याशी चर्चा केली. चर्चेदरम्यान मी अध्यक्षांचे ऐकते व त्यांच्या सूचनेनुसार निर्णय घ्यावे लागतात, असे विधान त्यांनी केल्याचा दावा प्रतिनिधींनी केला आहे.

यानंतर प्रतिनिधी मंडळ डॉ. आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भन्ते सुरई ससाई यांची भेट घेण्यासाठी गेले. यावेळी झालेल्या वादग्रस्त प्रसंगात एका महिला प्रतिनिधीकडे धाव घेत हात उगारल्याचा आरोप करण्यात आला असून, या घटनेचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याची माहिती देण्यात आली आहे. या प्रकाराला महिला प्रतिनिधींनी महिलांचा अपमान व अशोभनीय वर्तन असे संबोधले आहे.

सदर महाविद्यालय हे समाजाच्या योगदानातून उभे राहिलेले असून, व्यवस्थापनाने 'मालक' असल्याच्या भूमिकेतून वागणे योग्य नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विद्यापीठाला चौकशी समिती नेमण्याची वेळ का आली, याचे आत्मपरीक्षण संबंधितांनी करावे, अशीही मागणी करण्यात आली. महाविद्यालयात निर्भय व सुरक्षित वातावरण निर्माण करण्याऐवजी दडपशाहीचे वातावरण असल्यास ते दीक्षाभूमीच्या प्रतिमेला धक्का देणारे ठरेल, असा इशाराही देण्यात आला.

### प्रमुख मागण्या याप्रमाणे

1) डॉ. नितीन कोंगरे यांच्या अध्यक्षतेखालील चौकशी समितीने तातडीने अहवाल कुलगुरुंना सादर करावा.
2) कुलगुरुंनी निष्पक्ष निर्णय घ्यावा.
3) धर्मदाय आयुक्तांनी या प्रकरणाची दखल घ्यावी.
4) दीक्षाभूमीस्थित महाविद्यालयात अन्याय होत असल्यास त्याविरोधात आंबेडकरी समाज लढा देईल.
5) दीक्षाभूमी व परिसराचे पावित्र्य राखण्यात यावे.
6) डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाच्या प्राचार्या आणि समितीचे अध्यक्ष सर्व घडामोडींना जबाबदार असून ही जबाबदारी टाळता येणार नाही.

मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास आंबेडकरी जनता रस्त्यावर उतरून जनआंदोलन उभे करेल, असा इशारा प्रतिनिधींनी दिला.

यावेळी ज्योती आवळे, रंजना वासे, उज्वला गणवीर, रमा वासनिक, गायत्री नारनवरे, रमा मुन आणि कुंदा पाटील या प्रतिनिधी उपस्थित होत्या.

बहुजन सौरभ

## इथे संपर्क साधावा

**प्रवीण गायकवाड**
09850301528
विश्वकर्मा नगर, कुकडे लाऊड, वंजारीनगर, एम्प्रेस मिल कॉलनी

**निलेश कांबळे**
मो. 94236 34976
**एरिया :** उंटखाना, दत्तात्रयनगर, सुभेदार ले आउट , म्हाळगीनगर

**सुनील कुंभारे**
मो. 98238 94329

**विशाखा नारायणे**
मो. 99602 41648
**एरिया :** जोगी नगर , काशी नगर, धाडीवाल ले आऊट, सुयोग नगर, रानवाडी

**प्रमोद चहांदे**
मो. 9273170800
जोगी नगर, धाडीवाल ले आऊट, संयोग नगर, नरेंद्र नगर,

**चंदू नगरारे**
मो. 9975968852
शताब्दी नगर, काशी नगर, अभयनगर, जयवंतनगर, भीम नगर, जोगी नगर.

**निलेश वालदे**
मो.9764772886
मोहन नगर. गौतम नगर, गड्डीगोदाम परिसर

**मसारकर**
मो. 918080158604
धाडीवाल ले आउट.

**लिना विनोद भोवते**
मो.9021770694
इंदोरा, जरीपटका, भीमचौक, नाराघाट.

**प्रविण राजाराम ठवरे**
मो. 9372331798
मॉडेल टॉऊन, बेझनबाग.

**रितेश अनिल बोदेले**
मो. 9511843694
WCL पॉव ग्रीड

**गगन प्रताप नाहारकर**
मो. 8793389936
मेकोसाबाग, नवा नकाशा.

**प्रमोद बागडे**
मो. 9764973627
इंदोरा, सुगत नगर.

**बी प्रकाश राव**
मो. 9022621075
भीमचौक, बेझनबाग, मेकोसाबाग.

**पुष्पीत कराडे**
मो. 8055416108
वैशाली नगर, राणी दुर्गावती चौक.

**राहुल राजकुमार जांबुळकर**
मो. 9673392025, नारी.

**श्रीकांत वासनिक**
मो. 9767624345
काचीपूरा, बाबूळखेडा, पार्वती नगर, रमा नगर, जय भिम नगर.

**मंगेश शंभरकर**
मो. 9970258703
नरेंद्र नगर, सुयोग नगर, भिम नगर, शताब्दी नगर.

**निळकंठ वि. जवादे**
मो. 9623773365
रमा नगर, मनीष नगर.

**विनोद कृष्णराव डूले**
वेदांगा न्यूजपेपर, झिंगाबाई टाकळी, गोधनी रोड, .
मो. 7447767922

**आशिष थुल**
मो. 9423400956
धरमपेठ, आंबेडकरनगर

**राम मानवटकर**
मो. 8626037360,
न्यू. मनिष नगर

**अमन शरणागत**
मो.9575673895
टेकअप सिटी , दिघोरी, बहादूरा पेपर एजन्सी,

**राहुल आठवले**
मो.8485854398
संबोधी बुद्ध विहार, गिट्टीखदान, काटोल रोड, नागपूर

**दिगाबर पांडुरंग वासनिक**
मो.9561974131
454- नविन सुभेदार ले आऊट
दिनेश पेपर एजन्सी

**गौतम भीमराव मेश्राम**
जयवंत नगर , अभयनगर
मो. 9975941830

**स्वप्निल वाढबुधे**
न्यू अमर नगर, शेषनगर, विठ्ठल नगर, सिद्धेश्वरी नगर, चक्रपाणी नगर, गजानन नगर. मो. 96046 54382

**योगेश मेहर**
टेक ऑफ सिटी, बहादुरा परिसर
मो. 919552971648

**दिनेश टेंभुर्णे**
इंदोरा, लष्करी बाग, बेझनबाग, पी. डब्ल्यू एस. कॉलेज परिसर
मो. 8806511702

**गजानन गायकवाड**
कार्तिक मार्टङ्ग , बेसा सेंटर, पेट्रोल पंप जवळ, बेसा
मो.9921552488

**राजेश नंदनवार**
राहुलनगर, सोमलवाडा
मो. 9850335018

**विनायक हाडके**
प्रतापनगर
मो.न.9545750757

**शैलेश माटे**
जयताळा, त्रिमूर्ती नगर, अंबाझरी मो. 9767987363

**संदिप टेंभुरकर**
समता नगर, नारा रोड नागपूर
मो. 8657565247

**शशिकांत नारनवरे**
एस एस न्युज पेपर अँड मॅक्झिन सेंटर नरेंद्र नगर चौक रिंग रोड नागपूर 15
मो नं. 94033 42555

“ अडचणींचा सामना करणे हे यशाचे प्रवेशद्वार आहे... ”



बहुजन सौरभ

## संपादकीय

# समाज परिवर्तनाची खरी दिशा

शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्य आणि सामाजिक संघर्ष करावा लागेल. ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संदेश केवळ प्रेरणावाक्य नव्हे; तो अन्यायग्रस्त समाजाच्या मुक्तीचा लढाऊ आराखडा आहे. या घोषणेतील प्रत्येक शब्द हा क्रांतीचा पाया आहे. शिक्षणाशिवाय मुक्ती नाही, संघटनाशिवाय शक्ती नाही आणि संघर्षाशिवाय परिवर्तन नाही, हीच आंबेडकरी विचारसरणीची ठाम भूमिका आहे. भारतातील जातिव्यवस्था ही केवळ सामाजिक रचना नसून ती शोषणाची यंत्रणा आहे. या व्यवस्थेने बहुजन समाजाला शतकानुशतके शिक्षणापासून दूर ठेवले, आत्मसन्मान हिरावून घेतला आणि मानवी हक्कांपासून वंचित केले. अशा काळोखात डॉ. बाबासाहेबांनी शिक्षणाचा मशाल पेटवला. त्यांनी स्पष्ट सांगितले, ‘ज्ञानाशिवाय माणूस गुलामच राहतो.’ म्हणूनच शिक्षण हे दान नसून अधिकार आहे. स्वतः सामाजिक बहिष्कार, अपमान आणि आर्थिक दारिद्र्य झेलत त्यांनी कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे उच्च शिक्षण पूर्ण केले. त्यांचा जीवनप्रवास हा केवळ वैयक्तिक यशाचा इतिहास नाही; तो दडपशाहीविरुद्धच्या जिद्दीचा दस्तऐवज आहे. त्यांनी सिद्ध केले की बुद्धी, परिश्रम आणि ध्येय यांची सांगड घातली तर कुठलीही साखळी तुटू शकते. डॉ. बाबासाहेबांच्या दृष्टीने शिक्षण म्हणजे केवळ पदवी नव्हे. ते विवेक, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आत्मसन्मान जागवणारे साधन आहे. अशिक्षित समाजाला अंधश्रद्धा, अन्याय आणि धार्मिक अंधानुकरणाच्या साखळीत अडकवून ठेवले जाते. सुशिक्षित समाज मात्र प्रश्न विचारतो, तर्क करतो आणि अन्यायाविरुद्ध उभा राहतो. म्हणूनच शिक्षण ही क्रांतीची पहिली पायरी आहे. आर्थिक स्वातंत्र्याशिवाय सामाजिक मुक्ती नाही. डॉ. बाबासाहेबांनी सामाजिक न्यायासोबत आर्थिक न्यायालाही तितकेच महत्त्व दिले. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की राजकीय स्वातंत्र्य अपुरे आहे, जर आर्थिक स्वातंत्र्य नसेल. आजच्या काळात पैसा हा केवळ व्यवहाराचे साधन नाही; तो सत्तेचे आणि संधीचे केंद्र बनला आहे. ज्याच्याकडे संसाधने आहेत तोच समाजात प्रभावी ठरतो. डिजिटल व्यवहार, PI, बँकिंग व्यवस्था – या सर्व प्रगतीच्या गोष्टी असल्या तरी प्रश्न असा आहे की या व्यवस्थेचा लाभ कोणाला मिळतो? ग्रामीण, आदिवासी आणि वंचित समाज अजूनही गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि रोजगारापासून वंचित असेल, तर डिजिटल क्रांती अपुरी ठरते. आर्थिक विषमता वाढत असताना केवळ विकासाच्या घोषणा करून चालणार नाही. एका बाजूला संपत्तीची प्रचंड साठवणूक आणि दुसऱ्या बाजूला बेरोजगारी व दारिद्र्य, ही दरी केवळ आर्थिक नसून सामाजिक अस्थैर्य निर्माण करणारी आहे. पैशाच्या अतिरेकी मोहामुळे भ्रष्टाचार, काळा पैसा आणि नैतिक अधःपतन वाढते. म्हणूनच पैसा साधन आहे; तो समाजहितासाठी वापरला गेला तरच त्याचे मूल्य आहे. अन्यथा तो शोषणाचे शस्त्र बनतो. आंबेडकरी विचार स्पष्ट सांगतो, आर्थिक स्वावलंबनाशिवाय स्वाभिमान शक्य नाही. शिक्षण, उद्योग, कौशल्यविकास आणि उद्योजकता यांमधून बहुजन समाजाने आर्थिक शक्ती मिळवली पाहिजे. अन्यथा सत्ता आणि संपत्ती काही मोजक्या हातांतच केंद्रीत राहतील. आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी लढ्याची दिशा गरिबी ही नियती नाही; ती व्यवस्थेचा परिणाम आहे. त्यामुळे तिच्याशी लढणे आवश्यक आहे. आर्थिक अडचणी असूनही शिक्षणाचा मार्ग सोडणे म्हणजे स्वतःच्या भवितव्याशी अन्याय करणे होय. शासनाच्या शिष्यवृत्ती योजना, ‘कमवा आणि शिका’ उपक्रम, डिजिटल कोर्सेस, या सर्व संधींचा जाणीवपूर्वक वापर करणे आवश्यक आहे. परंतु केवळ योजनांची माहिती पुरेशी नाही; त्यासाठी जागरूकता आणि संघटन गरजेची आहे. विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन मार्गदर्शन केंद्रे, अभ्यासिका आणि माहिती केंद्रे उभारली पाहिजेत. शिक्षणासाठी संघर्ष करणे ही लाज नव्हे; तो अधिकार आहे. डॉ. आंबेडकरांनी सांगितले होते, ‘शिक्षण हेच मुक्तीचे शस्त्र आहे.’ हे शस्त्र हातात घेतल्याशिवाय परिवर्तन शक्य नाही. आर्थिक अडचणी या संघर्षाची सुरुवात असतात, शेवट नव्हे. समाजातील ज्येष्ठ नागरिक हे अनुभवाचे भांडार आहेत. त्यांनी जर आपला अनुभव, वेळ आणि संसाधने विद्यार्थ्यांसाठी दिली तर परिवर्तनाचा वेग वाढू शकतो. निवृत्त शिक्षक, अधिकारी, कर्मचारी यांनी करिअर मार्गदर्शन शिबिरे, स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण आणि वाचनालय उभारणीसाठी पुढाकार घेतला पाहिजे. सामर्थ्यानुसार आर्थिक मदत, पुस्तके, फी किंवा डिजिटल प्रक्रियेत सहाय्य, ही लहानशी मदतही विद्यार्थ्यांचे आयुष्य बदलू शकते. समाजाने ‘विद्यार्थी सहाय्यता निधी’ उभारून सामूहिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे. परिवर्तन केवळ भाषणांनी होत नाही; कृतीतून घडते. संघर्षाशिवाय परिवर्तन नाही, आजच्या काळात शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्य आणि सामाजिक बांधिलकी यांची सांगड घालणे अत्यावश्यक आहे. अन्याय, विषमता आणि भेदभाव यांच्याविरुद्ध आवाज उठवणे हीच खरी आंबेडकरी परंपरा आहे. शांततेच्या नावाखाली अन्याय सहन करणे हा पर्याय नाही. समाजाला जर खऱ्या अर्थाने समता हवी असेल तर शिक्षण सार्वत्रिक, गुणवत्तापूर्ण आणि सर्वांसाठी उपलब्ध झाले पाहिजे. आर्थिक संधींचे समतोल वितरण झाले पाहिजे आणि सर्वात महत्त्वाचे, बहुजन समाजाने आत्मसन्मान जागवून संघटित संघर्ष केला पाहिजे. डॉ. बाबासाहेबांचे स्वप्न केवळ स्मरणदिनांपुरते मर्यादित ठेवायचे नाही. ते प्रत्यक्षात उतरवायचे असेल तर प्रत्येकाने स्वतःला प्रश्न विचारला पाहिजे, मी शिक्षणासाठी काय करत आहे? मी आर्थिक स्वावलंबनासाठी काय प्रयत्न करतो आहे? मी समाजाच्या उन्नतीसाठी किती जबाबदारी घेतो आहे? पैसा आवश्यक आहे; पण तो माणुसकी आणि न्याय यांच्यापेक्षा मोठा नाही. शिक्षण हेच खरे सामर्थ्य आहे आणि संघटित संघर्ष हीच परिवर्तनाची दिशा आहे. समाज बदलायचा असेल तर विचार बदलावा लागेल; विचार बदलायचा असेल तर शिक्षण घ्यावे लागेल आणि शिक्षणाचे संरक्षण करायचे असेल तर संघर्ष करावा लागेल. हीच आंबेडकरी वैचारिक परंपरेची ज्वलंत हाक आहे. ■ ■

# न्यायव्यवस्थेतील मक्तेदारी नकोच, आता समानता हवी..!

**लोकशाहीचा आत्मा संसदेत नाही. तो न्यायालयांत जिवंत असतो. याबाबत बरेचदा बोलले गेले. विविध मंचांवर चर्चा झाली. संसद बहुमताने चालते. मात्र न्यायालय न्यायाने चालतात. संसद राजकारणाचे क्षेत्र असते. तिथे जाणारे बेरजेच्या राजकारणातून जातात. तिथे जातशाहीच्या जोडीला नोटशाही, धर्मशाहीचा प्रवेश झाला. न्यायालयें मात्र संविधानाचे रक्षणकर्ते. त्यामुळेच न्यायालयांवर लोकांचा अधिक विश्वास असतो. हा लोकशाहीचा सर्वात मौल्यवान पाया. त्यावर न्याय व्यवस्था उभी आहे. आज त्या पायाला तडे जात आहेत. कारण प्रश्न आहे न्याय देणाऱ्यांच्या सामाजिक रचनेचा. अयोद्धा - बाबरी प्रकरणात निकाल आला.**

पुराव्यांपेक्षा आस्थेवर देण्यात आला. ही वाच्यता निकाल देणाऱ्या न्यायधिशांनीच केली. हा न्याय बोधगयेतील महाबोधी महाविहारा बाबत कां नाही? तिथे तर ठासून पुरावे आहेत. पुरातत्त्व विभाग आहे. उत्खनन आहे. चक्रवर्ती सम्राट अशोकाने उभारलेला दगडी महाविहार आहे. बोधीवृक्ष आहे आणि परिसरात विखूरलेले हजारों अवशेष आहेत. जे उघड्या डोळ्यांनी दिसतात आणि जोडीला आस्थाही आहे. ते न्यायमूर्तींना दिसत नसावे काय? ते दिसावे, यासाठी 12 फेब्रुवारीपासून दिल्लीत महाविहार मुक्ती आंदेलन आहे. देशभरातून लोक जात आहेत. संविधान आल्यावर सर्व जुने कायदे मोडित काढले. तशी घोषणाही झाली. मग 1949 चा बी.टी. कायदा कसा राहु शकेल? यावर न्यायालयें मुकी कां आहेत. तसेच महाराष्ट्रातील पक्षफोडी, चिन्हांची पळवापळवी हे निकाल लोकशाहीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. त्या निर्णयात चालढकल, ‘तारिख पे तारिख’ आहे. युजीसी समानता कायदा आला. तर आठ दिवसात स्थगिती. ही कोणती मानसिकता असेल..? हे लोकांना कळते. ते सर्वोच्च न्यायालयात बसणाऱ्यांना कळत नसेल असे कसे म्हणावे? भारताच्या संविधानाने समतेचा उद्घोष केला. ‘कायदा सर्वांसाठी समान आहे.’ हे तत्त्व केवळ घोषणेसाठी नव्हे, तर वास्तवात उतरवण्यास मांडले गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट शब्दांत सांगितले होते. राजकीय लोकशाही टिकायची असेल, तर सामाजिक लोकशाही अपरिहार्य आहे. संविधानाच्या 76 वर्षांच्या काळात अनेक सामाजिक लढे झाले. आरक्षण, मंडल, शिक्षणाचा विस्तार झाला. राजकीय क्षेत्रात मागास, वंचित, उपेक्षित घटक पुढे आले. मात्र न्यायव्यवस्था परिवर्तनापासून अलिप्त का आहे ? खरे तर सामाजिक न्यायाचा उगम तिथून व्हावा. तेव्हा न्यायावर विश्वास वाढेल. इतिहास सांगतो. काही वर्गांना शिक्षण, सत्ता, न्यायव्यवस्थेपासून जाणीवपूर्वक दूर ठेवले. ते आजही न्याय व्यवस्थेच्या दरवाज्यांवरच उभे आहेत. ही अपघाती परिस्थिती की नियोजनबद्ध उपेक्षा? याचे उत्तर द्यावेच लागेल. न्याय व्यवस्थेची सामाजिक रचना पाहिली, तर हा प्रश्न अस्वस्थ करतो. खरेच आपण सामाजिक लोकशाहीकडे चाललो आहोत का? आकडे बोलतात. ते अस्वस्थ करतात.

केंद्र सरकारने संसदेत माहिती दिली. ही केवळ आकडेवारी नाही. ती न्याय व्यवस्थेच्या अंतर्गत वास्तवाची कबुली आहे. 2021 ते जानेवारी 2026 या कालावधीत देशातील उच्च न्यायालयांमध्ये 593 न्यायाधीशांची नियुक्ती झाली. या 593 पैकी फक्त 26 न्यायाधीश अनुसूचित जातीतील आहेत. केवळ 14 अनुसूचित जमातीतील आहेत. 80 ओबीसी प्रवर्गातील आहेत. 37 अल्पसंख्याक समुदायातील आहेत. महिलांची संख्या 96 आहे. महिलांना वेगळे ठेवले, तर उरलेले चित्र अधिकच अस्वस्थ करणारे ठरते. कारण या सर्व नियुक्त्यांपैकी 340 न्यायाधीश उच्च जातीतील आहेत. म्हणजे उच्च न्यायालयांतील जवळपास चारपैकी तीन न्यायाधीश एकाच सामाजिक वर्गातून येतात. हा योगायोग नाही. ही एक सातत्याने चालत आलेली रचना आहे. हीच आकडेवारी टक्के वारीत पाहिली तर चित्र आणखी स्पष्ट होते. अनुसूचित जाती 4.38 टक्के आहे. अनुसूचित जमाती 2.36 टक्के आहे. ओबीसी 13.49 टक्के आहे. उच्च जाती 79.76 टक्के आहे. ही आकडेवारी न्यायालयीन गुणवत्तेचे नव्हे, तर संधींच्या वितरणाचे वास्तव सांगते. कारण देशाच्या लोकसंख्येचा मोठा भाग या वंचित आणि मागासप्रवर्गांचा आहे. तरीही न्याय देणाऱ्या व्यवस्थेत त्यांचे अस्तित्व अत्यल्प आहे. न्याय म्हणजे अनुभवांचाही हिशोब आहे. न्याय म्हणजे केवळ कायद्याच्या कलमांचे वाचन नाही. न्याय म्हणजे माणसाच्या अनुभवांचे आकलन होय. अन्याय केवळ कागदावर घडत नाही. तो शरीरावर, मनावर आणि पिढ्या पिढ्या चालणाऱ्या जखमांवर उमटतो. ज्या न्यायाधीशाने कधी जातीय अपमान अनुभवला नाही. तो त्या अपमानाची खोली कशी मोजणार? ज्याने कधी विस्थापन पाहिले नाही. तो जमिनीच्या हक्कांचा न्याय कसा करणार? ज्याच्या आयुष्यात भूक कधी आलीच नाही. तो उपासमारीच्या प्रश्नांकडे केवळ आकडे म्हणूनच पाहणार नाही का? यामुळेच लोकांची भीती वाढत आहे. गुणवत्ता’ ही युक्तिवादात असते. त्यामागची वस्तुस्थिती काय असते? न्यायाधीशांच्या नियुक्तीबाबत नेहमी एक युक्तिवाद पुढे केला जातो ‘निवड गुणवत्तेवर होते.’ हा युक्तिवाद ऐकायला योग्य वाटतो, पण तोअर्धसत्य आहे. कारण प्रश्न असा आहे की मागास, वंचिताच्या गुणवत्तेला संधीच दिली जात नाही. शिक्षण, संसाधने, सामाजिक भांडवल आणि संस्थात्मक पाठबळ. या सर्व बाबतीत ऐतिहासिक दृष्ट्या काही वर्गांना प्राधान्य मिळाले. तर काहींना सातत्याने दूर ठेवले गेले. आज न्यायालयांमध्ये मागास घटकांचा अभाव हा त्यांच्या अपात्रतेचा पुरावा नाही. तर व्यवस्थेतील भेदभावाचा मोठा पुरावा आहे. कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी संसदेत सांगितले की, न्यायाधीशांच्या नियुक्तीची प्रक्रिया मेमोरँडम ऑफ प्रोसिजरनुसार चालते. सुप्रीम कोर्टासाठी मुख्य न्यायाधीश प्रस्ताव देतात. तर हायकोर्टासाठी संबंधित मुख्य न्यायाधीश. सरकार म्हणते, आम्ही सामाजिक विविधतेसाठी आवाहन करतो. पण प्रश्न असा आहे. आवाहन पुरेसे आहे का? जेव्हा आकडे सातत्याने एकाच दिशेने बोट दाखवत असतात. तेव्हा ती प्रक्रिया निष्पक्ष आहे. असे कसे म्हणायचे? सामाजिक संतुलन साधणे ही केवळ विनंतीवर सोडण्याची बाब आहे का? ती घटनात्मक जबाबदारी नाही काय? सरन्यायाधीश पदावरून भूषण गवई सेवानिवृत्त झाले. तेव्हा सर्वोच्च न्यायालयात 33 न्यायमूर्ती होते. त्यात 20 उच्च जातीची होती. ही टक्केवारी 60 टक्के. उरलेल्या 40 टक्यात 5 ओबीसी, 1 एससी, चार अल्पसंख्याक (1 मुस्लिम, 1 ख्रिश्चन, 1 पारसी, 1 जैन) तिघांच्या जाती माहित नाहीत. अशी स्थिती आहे. द्रमुक पक्षाचे खा. पी. विल्सन यांनी उपस्थित केलेला मुद्दा हा केवळ राजकीय टीका नाही. तो संविधानाच्या आत्म्याशी निगडित आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की उच्च न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालय समाजातील विविधतेचे प्रतिबिंब ठरत नाहीत. त्यांची भीती रास्त आहे. कारण न्यायव्यवस्थेत प्रतिनिधित्व नसेल, तर वंचित घटकांचे हक्क अधिक असुरक्षित होतात. ऐतिहासिक दृष्ट्या उत्पीडित समुदायांचे न्यायालयांतील अल्प प्रतिनिधित्व म्हणजे त्यांच्या हक्कांचे अपुरे संरक्षण होय. आज न्यायालयीन समता ही कोणत्याही एका वर्गाची मागणी राहिलेली नाही. ती लोकशाही टिकवण्याची अट बनली आहे. कारण ज्या व्यवस्थेत लोक स्वतःला पाहू शकत नाहीत. त्या व्यवस्थेवर विश्वास टिकत नाही. न्यायालयांमध्ये एससी, एसटी, ओबीसी, अल्पसंख्याक आणि महिलांचे प्रमाणशीर प्रतिनिधित्व म्हणजे न्यायालयांना कमकुवत करणे नव्हे. तर त्यांना अधिक मजबूत करणे आहे. न्यायालय हे लोकशाहीचे पवित्र मंदिर मानले जाते. तिथे जात, धर्म, वर्ग, लिंग, पंथ, पक्ष याचा भेद मिटतो. तिथे केवळ संविधान बोलते.





भूपेंद्र गणवीर
9850031019

असा आपला विश्वास आहे. मात्र गर्भगृहात डोकावून बघता, प्रश्न पडतो न्यायमंदिर खरेच सर्वांसाठी खुले आहे कां? तिथे अजूनही मोजक्या वर्गांचे अधिराज्य आहे काय..? न्याय देणाऱ्यांच्या रचनेत समानता नसेल तर न्यायाची तराजू तोलामोलाची कशी राहील? हा प्रश्न असंख्य मनात आहे. न्यायाधीशांच्या नियुक्तीत प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची मागणी ही अतिरेकी नाही. विधिमंडळ आणि कार्यपालिकेत जे तत्त्व मान्य आहे. ते न्यायपालिकेला लागू का होऊ नये? संविधान केवळ कायदेशीर दस्तऐवज नाही. ते सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे. न्यायपालिका त्या परिवर्तनापासून अलिप्त राहू शकत नाहीत. आज प्रश्न हा नाही की न्यायालये स्वतंत्र आहेत की नाहीत. खरा प्रश्न हा आहे. न्यायालये सर्वांची आहेत का? जोपर्यंत न्याय देणाऱ्या खुर्च्यांवर देशाचा संपूर्ण समाज बसत नाही. तोपर्यंत न्यायालयीन समता हा संघर्ष सुरूच राहील. कारण न्याय हा केवळ निकाल नसतो. तो विश्वास असतो. हा विश्वास तेव्हाच टिकतो. जेव्हा न्यायालये समाजाचे खरे प्रतिबिंब बनतात. याकडे कानाडोळा करणे परवडणारे नसेल. एवढे मात्र खरे! ■ ■

# भागवतांची बौद्धिक कसरत

**आरएसएसने शंभरी पार केल्यानंतर विविध कार्यक्रमाद्वारे अधिकाधिक सुज्ञ लोकांमध्ये स्वतःची विचारधारा रूजविण्यासाठी रूप बदलण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. 100 वर्ष की संघ यात्रा नए क्षितिज या नावाने मुंबई येथे आयोजित सरसंघचालक मोहन भागवत यांची दोन दिवसीय व्याख्यानमाला व त्यानंतरची प्रश्नोत्तरे हे या चतुराईचे बेमालुम मिश्रण होते.**

भागवतांच्या व्याख्यानात अनेक विषयांचा अंतर्भाव होता. त्यापैकी धार्मिक विषयाच्या संदर्भात बोलताना त्यांनी वैदिक धर्म व बौद्ध धर्म हे दोन्ही सनातन धर्म आहेत, असे बिनदिक्कत खोटे सांगून सत्याचा आपलाप केला. पुढे ते असेही म्हणाले की, बुद्धांनी सनातन धर्मात जे त्याज्य होते, त्यात सुधारणा केली. हा एक भ्रम पसरविण्याचा प्रकार आहे. प्रचलित समाजव्यवस्थेचे मोठ्या प्रमाणात नैतिक अधःपतन झाले असल्याचे बुद्धांच्या निदर्शनास येत होते. त्यामुळे ती बदलण्याच्या उपायांकडे त्यांनी लक्ष दिले नाही. तर ती नष्ट करून टाकणे त्यांना योग्य वाटले.

बुद्धांनी सांगितले, नीती म्हणजे धम्म व धम्म म्हणजे नीती. या तत्वानुसार बुद्धांचा धम्म नीतीवर आधारित आहे. बुद्धांच्या धम्माचा उद्देश जगाची पूनर्ररचना करणे हा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्म पुनःस्थापित केला. परंतु भागवतांना हे मान्य करण्याची अडचण होत असल्याने ते डॉ. बाबासाहेबांनी बौद्ध धम्माचा पुनरूच्चार केला असे म्हणतात.

प्राचीन इतिहासाचा आढावा घेतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या ‘क्रांती आणि प्रतिक्रांती’ या ग्रंथात म्हणतात की, प्राचीन भारताचा इतिहास हा दुसरे तिसरे काही नसून बौद्ध धम्म विरूद्ध ब्राम्हणी धर्म यांच्यातील मरणांतिक संघर्षाचा इतिहास आहे. आक्रमकारी मुस्लिम राजवटीत गृहत्यागी बौद्ध भिक्खू काषायधारी वस्त्रांमुळे सहज ओळखला गेल्याने त्यांच्या कत्तली करण्यात आल्या. विश्वविख्यात नालंदा बौद्ध विद्यापीठाला जाळण्यात आल्याने या विद्यापीठाच्या ग्रंथालयातील लाखोंच्या संख्येने असलेले ग्रंथ आगीत भस्मसात झाले. ही आग सहा महिन्यांपर्यंत धुमसत राहिली. हे आक्रमकारी मुस्लिम राजे भारतावर आक्रमण करून सत्ता प्रस्थापित करू शकले, त्यालाही ब्राम्हणी धर्म कारणीभूत आहे. मुस्लीम आक्रमणाच्या पूर्वी ब्राम्हणी धर्माला राजाश्रय प्राप्त झाला होता तसेच पुरोहितपणा करणारा ब्राह्मण गृहस्थी असल्यामुळे ब्राह्मणी धर्म मुस्लिम आक्रमणानंतरही टिकून राहिला. तर ब्राह्मणी धर्माने केलेल्या छळामुळे व मुस्लिम आक्रमकांच्या बौद्ध धर्मावरील आघातामुळे बौद्ध धम्म लयास गेला. या वस्तुस्थितीला भागवतांनी मोठ्या खुबीने बगल दिली. इतकेच नव्हे तर भागवतांनी वैदिक ब्राह्मणी धर्म हाच सनातन धर्म असल्याचे इतिहासाची पाने न चाळलेल्या सेलेब्रिटीसमोर सहजपणाने खपविले. बुद्धांनी समता शिकविली. डॉ. बाबासाहेब त्याच समतेचा आग्रह धरतात. परस्पर बंधुभाव स्थापित होण्यासाठी समाजात समता आवश्यक आहे. भागवत या उलट समरसतेवर भर देतात. समरसतेचा उच्चार त्यांनी आपल्या व्याख्यानातही केला. भागवतांनी जाती पंडीत, पुरोहितांनी निर्माण केल्या हे उघडपणे कबुल केले आहे. मग जातींच्या निर्मुलनसाठी प्रयत्न करणे ही त्यांची व त्यांच्या आरएसएसची इतरांपेक्षा अधिक जबाबदारी आहे. परंतु समरसतेमुळे व्यक्ती जातीच्या बंधनातून मुक्त होत नाही, हे भागवत जाणतात. त्यामुळे वर्णवर्चस्वातील त्यांच्या स्थानाला कोणताही धक्का लागत नाही. या अंगाने समरसता त्यांच्यासाठी सोयीची तसेच फायद्याची ठरते.

जोगेंद्र सरदारे
मो. 9422138322



डॉ. बाबासाहेब संविधान सभेतील एका भाषणात जोपर्यंत भारतात जाती आहेत, तोपर्यंत भारत एक राष्ट्र या संबोधनास कसा काय पात्र ठरू शकतो, असा रोकडा सवाल केला आहे. असे म्हणताना जातीच्या आधारे तुलना करता प्रत्येक जात ही स्वतंत्र राष्ट्रच आहे, या जळजळीत वास्तवाकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. भागवतांनी हिंदू धर्म नावाचा असा कोणताही धर्म नाही, असे आपल्या व्याख्यानात स्पष्ट केले. त्यानंतर हिंदू राष्ट्राचे चित्र उभे करून ते त्यासाठी दंडनीतीचा अवलंब करण्याची भाषा करतात, हा विरोधाभास करण्यामागे त्यांच्या संकल्पनेत ब्राह्मण राष्ट्र ही त्यांची अवधारणा आहे आणि असे ब्राह्मण राष्ट्र आरएसएसला निर्माण करावयाचे आहे असे सिद्ध होते. म्हणून त्याची सर्व धर्मनिरपेक्ष भारतीयांनी नोंद घ्यावी आणि असा संविधान विरोधी प्रयत्न हाणून पाडावा. ■ ■

# धम्म, संयम आणि नैतिक जबाबदारी

**काल भंते सुरई ससाई यांच्याशी संबंधित वर्मानपत्रात बातमी आली आणि एक व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाला असून त्यात बौद्ध महिलांच्या प्रतिनिधी मंडळाशी झालेल्या वादाचा प्रसंग दिसत असल्याने अनेकांच्या मनात संताप आणि वेदना निर्माण झाल्या आहेत. शांतता, मैत्री आणि करुणेचा संदेश देणाऱ्या तथागत भगवान बुद्धांच्या परंपरेत भिक्खू हा केवळ धार्मिक व्यक्ती नसतो, तर तो समाजाचा शिक्षक आणि आदर्श मानला जातो. त्यामुळे त्याच्याकडून संयम, समजूतदारपणा आणि संवादाची अपेक्षा अधिक असते.**

भंते सुरई ससाई जपानमधून भारतात आले तेव्हा नागपूरकरांनी त्यांना मोठ्या आदराने स्वीकारले. त्यांच्या धम्मकार्याला पाठबळ दिले, संकटकाळात साथ दिली. त्यांचा व्हिसा संपल्यावर निर्माण झालेल्या परिस्थितीत नागपूरमधील अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि बौद्ध वकिलांनी पुढाकार घेऊन कायदेशीर मदत केली, त्यांना आधार दिला. त्या काळात समाजाने त्यांना दिलेला सन्मान आणि पाठिंबा हा त्यांच्या कार्यावरील विश्वासाचा पुरावा होता. यानंतर त्यांनी बुद्धगया मुक्ती आंदोलन उभारले. त्या आंदोलनातून त्यांचे नेतृत्व सरकारच्या निदर्शनास आले आणि त्यांना अल्पसंख्यांक आयोगाचे सदस्य म्हणूनही संधी मिळाली. समाजाने त्यांना एक धम्मनेते म्हणून मान्यता दिली. परंतु पुढील काळात बुद्धगया मुक्तीसाठी दाखल झालेल्या प्रकरणांबाबत अपेक्षित गती दिसली नाही, अशी समाजात नाराजीही अधूनमधून व्यक्त होत आली आहे. दीक्षाभूमी स्मारक समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांच्याकडे मोठी जबाबदारी आहे. दीक्षाभूमी ही केवळ एक स्मारक जागा नाही, तर ती बौद्ध समाजाच्या भावना, इतिहास आणि अस्मितेचे प्रतीक आहे. त्यामुळे तेथे येणाऱ्या कोणत्याही प्रतिनिधी मंडळाच्या मागण्या, तक्रारी किंवा सूचना शांतपणे ऐकून घेणे आणि त्यावर मार्ग काढण्याचा प्रयत्न करणे हे अध्यक्ष म्हणून त्यांचे कर्तव्य आहे. समाजमाध्यमांवर प्रसारित झालेल्या व्हिडिओमध्ये महिलांच्या शिष्टमंडळाशी झालेल्या वादाच्या प्रसंगाने अनेकांना धक्का बसला. जर खरोखरच संवादाऐवजी आक्रमक प्रतिक्रिया व्यक्त झाली असेल, तर ते अत्यंत चुकीचे आणि खेदजनक आहे. कारण बुद्धांच्या शिकवणीत अहिंसा, करुणा आणि संयम यांना सर्वोच्च स्थान आहे. विशेषतः महिलांशी संवाद साधताना अधिक संवेदनशीलता अपेक्षित असते. अशा प्रसंगी शांतता आणि समन्वय साधण्याची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. आज गरज आहे ती दोषारोप करण्यापेक्षा आत्मपरीक्षणाची. समाज ज्यांना आदर्श मानतो, त्यांच्याकडून अधिक उच्च दर्जाचे आचरण अपेक्षित असते. धम्माचा प्रचार केवळ भाषणातून नाही, तर वर्तनातून होतो. त्यामुळे अशा प्रसंगांमुळे समाजात निर्माण झालेला संभ्रम दूर करणे, संवाद साधणे आणि विश्वास पुनर्स्थापित करणे आवश्यक आहे.



दीक्षाभूमी स्मारक समितीने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन योग्य तो निर्णय घ्यावा, अशी समाजाची अपेक्षा आहे. अध्यक्ष म्हणून जबाबदारी स्वीकारणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने त्या पदाची प्रतिष्ठा जपणे आवश्यक असते. परिस्थिती अधिक चिघळू नये यासाठी सत्यस्थिती स्पष्ट करणे, आवश्यक असल्यास नैतिक जबाबदारी स्वीकारणे आणि समाजाशी खुलेपणाने संवाद साधणे हेच योग्य पाऊल ठरेल.

बौद्ध समाज हा शांततेचा आणि विचारांचा मार्ग स्वीकारणारा समाज आहे. त्यामुळे अशा प्रसंगांमुळे निर्माण झालेला अस्वस्थपणा दूर करण्यासाठी संयम, प्रामाणिकपणा आणि करुणेचा मार्गच स्वीकारला गेला पाहिजे. त्यातूनच समाजाचा विश्वास टिकून राहील आणि धम्माची प्रतिष्ठा अबाधित राहील. भंते सुरई ससाई हे आता 92 वर्षाचे वयोवृद्ध झाले आहेत, हे वास्तव आहे. वय वाढल्यावर शारीरिक आणि मानसिक थकवा येऊ शकतो, कधी कधी क्षणिक संतुलनही ढळू शकते, असे मानता येईल. परंतु बौद्ध धम्माच्या परंपरेत भिक्खूचे स्थान हे केवळ वयानुसार नाही, तर संयम, करुणा आणि प्रज्ञा यांमुळे उंचावलेले असते. वय वाढत जाते तसा संयम अधिक दृढ व्हायला हवा, हीच धम्माची शिकवण आहे.

म्हणूनच घडलेल्या प्रसंगाकडे केवळ वयाच्या कारणाने पाहणे योग्य ठरणार नाही. समाज भिक्खूकडून आदर्श वर्तनाची अपेक्षा ठेवतो. विशेषतः जेव्हा एखादी व्यक्ती धम्माचा प्रचार करते, समाजाला शांती, मैत्री आणि करुणेचा संदेश देते, तेव्हा तिच्या प्रत्येक कृतीत त्या मूल्यांचे प्रतिबिंब दिसणे आवश्यक असते. जे काही घडले, ते निश्चितच अयोग्य आणि खेदजनक आहे. अशा प्रसंगामुळे समाजात खेद आणि अस्वस्थता निर्माण होते. त्यामुळे या घटनेकडे गांभीर्याने पाहून आत्मपरीक्षण होणे गरजेचे आहे. धम्माचा मार्ग हा संयम आणि संवादाचा आहे आणि तोच मार्ग पुढेही कायम राहावा, हीच सर्वांची अपेक्षा आहे. भंते सुरई ससाई यांनी अनेकदा विपश्यनेच्या परंपरेबाबत विरोधी भूमिका घेतल्याचे समजले जाते. परंतु बुद्धांनी दिलेला विपश्यना हा अत्यंत वैज्ञानिक आणि अनुभवाधिष्ठित उपदेश मानला जातो. मनाचे निरीक्षण, भावनांवर नियंत्रण आणि समतोल राखण्याची साधना म्हणून विपश्यनेला विशेष महत्त्व आहे. या साधनेचा मूळ हेतूच आहे, मनात करुणा, मैत्री आणि संयम वाढवणे. भंते सुरई ससाई यांनी जर या दृष्टीने विपश्यनेच्या तत्त्वांना अधिक व्यापकपणे स्वीकारले असते, तर कदाचित मनातील संतुलन अधिक दृढ झाले असते. कारण विपश्यना ही केवळ ध्यानपद्धती नसून, ती राग, द्वेष आणि आवेग यांवर नियंत्रण ठेवण्याची एक पद्धत आहे. असो जे झाले ते खेदजनक आहे. बौद्ध महिलांच्या प्रतिनिधी मंडळास आता तरी न्याय मिळावा. कारण बौद्ध महिला प्रतिनिधी मंडळ न्याय मागण्यासाठी गेले होते. त्यांनी शुभ्र वस्त्र परिधान केले होते. ते शांततेचे प्रतीक आहे. त्या व्हिडिओत उपासिका भीमाच्या लेकी दिसतात.



अनिल वैद्य
माजी न्यायाधिश
मो. 9657758555

त्यांच्या मनात आक्रमकता नव्हती, तर आपली बाजू मांडण्याची आणि काही प्रश्नांवर समाधानकारक उत्तर मिळवण्याची अपेक्षा होती. त्या विनयशीलतेने, नम्रतेने आणि धम्माच्या संस्कारांनीच त्या भेटायला गेल्या होत्या. त्यांचा उद्देश कुणावर दबाव आणणे किंवा वाद निर्माण करणे हा नव्हता.

बौद्ध परंपरेत महिलांनाही समतेचा आणि सन्मानाचा अधिकार आहे. त्यामुळे आपले प्रश्न मांडण्यासाठी त्या पुढे आल्या, हे त्यांच्या जागरूकतेचे आणि धम्मावरील विश्वासाचेच प्रतीक आहे. त्या कोणालाही मारण्यासाठी किंवा आक्रमण करण्यासाठी गेल्या नव्हत्या; उलट शांततेच्या मार्गाने संवाद साधून न्याय मिळावा, हीच त्यांची भूमिका होती. अशा वेळी त्यांच्याकडे करुणा, समजूतदारपणा आणि संयमाने पाहणे अपेक्षित होते. कारण त्या विरोधक म्हणून नव्हे, तर आपल्या समाजातीलच भगिनी म्हणून, आपल्या समस्या मांडण्यासाठी आणि योग्य मार्ग शोधण्यासाठी तेथे आल्या होत्या.

या संपूर्ण प्रसंगात बौद्ध महिलांनी ज्या प्रकारे संयम, शांतता आणि विनयशीलता दाखवली, त्यातूनच त्यांनी खऱ्या अर्थाने धम्माचे आचरण करून दाखवले. त्या न्याय मागण्यासाठी आल्या होत्या, पण परिस्थिती ताणली गेली तरी त्यांनी प्रतिक्रिया देताना मर्यादा ओलांडल्या नाहीत. राग, आक्रमकता किंवा प्रतिशोधाचा मार्ग न निवडता त्यांनी संयमाचा मार्ग स्वीकारला. बुद्धांनी सांगितलेल्या करुणा, मैत्री आणि समतेच्या तत्त्वांचा प्रत्यय त्यांच्या वर्तनातून दिसून आला. कठीण प्रसंगातही ज्यांनी स्वतःवर नियंत्रण ठेवले, शांततेने उभे राहिले आणि संवादाची भूमिका सोडली नाही, त्यांनीच धम्माची खरी शिकवण जपली असे म्हणावे लागेल. म्हणूनच या घटनेत बौद्ध महिलांनी दाखवलेला संयम हेच त्यांच्या धम्मनिष्ठेचे प्रतीक ठरते. त्यांनी सिद्ध करून दिले की खरे बौद्धत्व केवळ शब्दांत नसते, तर ते आचरणातून प्रकट होते. अशा प्रसंगी तथागत भगवान बुद्धांनी नेहमीच संवाद, करुणा आणि संयमाचा मार्ग दाखवला असता. रागाला रागाने नव्हे, तर समजुतीने आणि शांततेने उत्तर देण्याची शिकवण त्यांनी दिली आहे. यासाठी काही सुत्ते विशेष मार्गदर्शक ठरतात -

1) कक्कचूपम सुत्त (Kakacupama Sutta – मज्झिम निकाय 21)
या सुत्तात बुद्ध म्हणतात की, जर कोणी आपल्याशी कठोर वागले, अपमान केला किंवा त्रास दिला, तरी मनात द्वेष निर्माण होऊ देऊ नका. जरी एखाद्याने अन्याय केला, तरी त्याच्याविषयी करुणा आणि मैत्री ठेवावी. याचा अर्थ असा की कोणत्याही संघर्षाच्या प्रसंगी संयम राखणे आणि हिंसेला प्रतिसाद न देणे हा खरा धम्ममार्ग आहे.

2) मेत्ता सुत्त (Metta Sutta – सुत्तनिपात)
या सुत्तात बुद्धांनी सर्व प्राणिमात्रांबद्दल प्रेम, मैत्री आणि सद्भाव ठेवण्याची शिकवण दिली आहे. मतभेद असले, तक्रारी असल्या, तरी त्यावर करुणा आणि संवादातून मार्ग काढावा, हा या सुत्ताचा गाभा आहे.

3) धम्मपदातील उपदेश
‘नहि वेरेन वेरानि, सम्मन्ति ध कुदाचनं;
अवेरेन च सम्मन्ति, एस धम्मो सनन्तनो.’

याचा अर्थ, वैराने वैर कधीच शांत होत नाही; ते फक्त अवैर, म्हणजेच मैत्री आणि क्षमेमुळेच शांत होते. हा सनातन धम्म आहे. या शिकवणींनुसार, अशा परिस्थितीत बुद्धांनी प्रथम दोन्ही बाजू शांतपणे ऐकून घेतल्या असत्या, राग शमवण्याचा प्रयत्न केला असता आणि संवादातून तोडगा काढण्यावर भर दिला असता. करुणा, समजूतदारपणा आणि संयम या तत्त्वांवर आधारित मार्गच त्यांनी दाखवला असता. आज या शिवणुकीची आठवण करून निर्माण झालेली परिस्थिती हाताळावी. शांततेने समाजाने मार्ग काढला पाहिजे हीच बुद्ध जीवन जगण्याची पद्धत आहे. ■ ■




स्वाभिमानाचे स्मरणशिल्प -८३

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि रमाई आंबेडकर यांच्या संयुक्त पुतळा भाणेगाव ता. कामठी जिल्हा नागपूर.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि आईसाहेब रमाई यांचा पुतळा भाणेगाव ता. कामठी, जिल्हा नागपूर, येथील आहे. दिनविशेष दिवसावर लोक एकत्र येतात.

संवाद मित्र,कपिल नारनवरे

मो. 9370773608

# ‘वारकरी कुठल्याही प्रकारचा भेदभाव करत नाही’

## हभप ज्ञानेश्वर महाराज बंडगर

**नागपूर :** सक्करदरा, नागपूर येथील सेवादल महाविद्यालयाच्या सभागृहात मधुकरराव वाघमारे स्मृती प्रित्यर्थ आयोजित कीर्तन सोहळ्यात हभप ज्ञानेश्वर महाराज बंडगर यांनी वारकरी संप्रदायाच्या समतावादी परंपरेवर प्रभावी भाष्य केले. संत तुकाराम महाराजांच्या ‘होय होय वारकरी’ या अभंगावर आधारित कीर्तनातून त्यांनी वारकरी संप्रदाय हा भेदभावमुक्त आणि समतेचा मार्ग असल्याचे प्रतिपादन केले.

‘वेद म्हणजे भेद; परंतु संतवाणी म्हणजे समता,’ असे सांगत बंडगर महाराजांनी वैदिक कर्मकांड, जातिभेद आणि उच्च-नीचतेच्या संकल्पनांवर संतांनी केलेल्या प्रहाराची उदाहरणांसह मांडणी केली. काशी, द्वारका आणि पंढरपूर यांची तुलना करताना त्यांनी पंढरपूरच्या वारीत देवाबरोबर संतपरंपरेचेही अधिष्ठान असल्याचे नमूद केले. वारीत सर्वजण जात, पंथ, लिंगभेद विसरून एकत्र येतात, शिदोरी एकत्र करून ‘काला’ करतात आणि रोटीबंदीला छेद देतात, असे ते म्हणाले. पांडुरंगाला कर्मकांड, नवस, सोन्या-चांदीची अपेक्षा नसून प्रेम, भक्ती आणि समानतेची भावना महत्त्वाची असल्याचा संदेश त्यांनी दिला.

‘सामाजिक परिवर्तनात संतांचे योगदान’ या विषयावरही त्यांचे व्याख्यान झाले. वारकरी संत चळवळ ही केवळ भक्तीची नव्हे, तर सामाजिक विषमतेविरोधातील चळवळ असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. सनातनी व्यवस्थेकडून संतांना सहन करावे लागलेले विरोध व छळ याचा उल्लेख करत त्यांनी या



परंपरेला सामाजिक क्रांतीची नांदी म्हटले. कार्यक्रम महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे केंद्रीय उपाध्यक्ष संजय शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. प्रमुख अतिथी म्हणून जवाहर विद्यार्थी गृह नागपूरचे अध्यक्ष शेखर सावरबांधे, नवउन्मेषण साहित्य सभेच्या सुधा बामनपल्लीवार, सत्यशोधक चळवळीचे अभ्यासक विचारवंत डॉ. अशोक चोपडे, सत्यशोधक प्रबोधनकार अरविंद माळी, खैरे कुणबी बहुउद्देशीय विचारमंचचे टेमराज माले, मधुकरराव वाघमारे यांच्या पत्नी माया वाघमारे तसेच ओबीसी वकील महासंघाचे अॅड. विनोद खोबरे उपस्थित होते. कीर्तनास हभप देवानंद महाराज प्रधाने यांच्या वारकरी संचाने साथ दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाबा बीडकर यांनी केले, संचालन अनुज हुलके यांनी केले तर आभार प्रदर्शन विनोद उलिपवार यांनी मानले.

मधुकरराव वाघमारे स्मृती व्याख्यान व कीर्तन आयोजन समितीत शंभुक संताजी डॉ. मेघनाद साहा प्रबोधन मंच, सत्यशोधक समाज विदर्भ, विद्रोही सांस्कृतिक चळवळ, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, बहुजन संघर्ष समिती, नवउन्मेषण साहित्य सभा, सावित्रीच्या लेकी, सत्यशोधक महिला महासंघ, अभियान मासिक, सत्यशोधक शिक्षक प्रबोधिनी, श्री गुरुदेव युवा मंच, रमणा मारुती भजन मंडळ नागपूर, ओबीसी वकील महासंघ नागपूर, महात्मा फुले शिक्षण संस्था, जवाहर विद्यार्थी गृह, सर्व शाखीय कुणबी कृती समिती, खैरे कुणबी बहुउद्देशीय विचार मंच, प्रागतिक कुंभार समाज संघटना व विदर्भ तेली समाज महासंघ या संघटनांचा सहभाग होता. भरगच्च उपस्थितीत पार पडलेल्या या दोन दिवसीय कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# महेंद्र गायकवाड यांच्या तीन पुस्तकांचे प्रकाशन




**नागपूर :** आंबेडकरनिष्ठ दलित साहित्यातील तिसऱ्या पिढीचे अग्रगण्य कवी, संपादक, समीक्षक महेंद्र गायकवाड यांच्या **‘सत्याला ग्लानी का आली?’** या पाचव्या कवितासंग्रहाचे आणि बॅरि. **राजाभाऊ खोब्रागडे अनुभव आणि आठवणी, ‘रिपब्लिकन चळवळीचे आधारस्तंभ अॅड. दत्ता कटटी : ऐतिहासिक पत्रे लेखकार्य’** या दोन संपादित पुस्तकांचे प्रकाशन कोल्हापूरचे इतिहास संशोधक डॉ. संभाजी बिरांजे यांच्या हस्ते होत आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत प्रा. अशोक गोडघाटे राहतील. विशेष अतिथी म्हणून डॉ. अनमोल शेंडे, डॉ. मच्छिंद्र चोरमारे पुस्तकांवर भष्य करतील. यापुर्वी महेंद्र गायकवाड यांची पंधरा महत्वपूर्ण पुस्तके प्रकाशित झाली आहेत समाज, साहित्य, संस्कृती आणि इतिहास याचे सखोल चिंतन महेंद्र गायकवाड यांनी केले आहे. सदर पुस्तकांचा प्रकाशन समारंभ रविवार दिनांक 15 फेब्रुवारी रोजी **‘अर्पण सभागृह’**, विदर्भ हिंदी मारभवन, सीताबर्डी, नागपूर येथे सायंकाळी 5:30 वाजता होत आहे. या कार्यक्रमात उपस्थित राहण्याचे आवाहन आंबेडकराईट मुव्हमेंट ऑफ कल्चर अॅण्ड लिटरेचर, बोधिसत्त्व फाऊंडेशन, साक्षी प्रकाशन आणि संघर्ष प्रकाशनाने केले आहे.

## महत्वाचे

### डॉ. ज्ञानेश्वर कृष्णाजी पोहाणे यांचे निधन



**नागपूर :** विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्याची चिंता वाहणारे, शिक्षकांना शिस्तीचे धडे देणारे आणि शिक्षकांना सातत्याने मार्गदर्शन करणारे हाडाचे शिक्षक श्री साई शिक्षण एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक श्री. ज्ञानेश्वर महिला महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर कृष्णाजी पोहाणे यांचे गुरुवार 12.2.26 ला पहाटे साडे पाच वाजता 86 व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मानेवाडा दहन घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या जाण्याने पोहाणे परिवार आणि शिक्षण संस्थेत फार मोठी पोकळी निर्माण झालेली आहे.

# काव्यगर्जना : कविसंमेलन




**नागपूर :-** त्यागमूर्ती रमाबाई भीमराव आंबेडकर यांच्या 128व्या जयंतीनिमित्त शिवराज नगर बुध्द विहार, नागपूर येथे ‘काव्यगर्जना’ कविसंमेलन नुकतेच पार पडले.

जाई पूर्णा पंचभाई असोसिएशन, नागपूर, एड. संघमित्रा बाभरे, करुणा मून व प्रितीबाला बोरकर यांच्या संयुक्त विद्यमाने हे कविसंमेलन आयोजित करण्यात आले होते. कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी वैशाली बोरकर, प्रमुख अतिथी प्रसेनजीत गायकवाड, डॉ. मनोहर नाईक होते.

कविसंमेलन मध्ये दीपक पंचभाई, करुणा मून, एड. संघमित्रा बाभरे, प्रितीबाला बोरकर, लिलाधर गायकवाड, संजय गोडघाटे, रंगराज गोस्वामी, अॅड. सुधाकर आटे, सरिता सातारडे, दिपाली दीप, सुषमा कलमकर, प्रतिभा सहारे, ज्योत्स्ना बन्सोड व चरणदास वैरागडे यांनी कविता सादर केल्या. प्रास्ताविक अॅड. संघमित्रा बाभरे, संचालन यांनी दीपक पंचभाई, आभार करुणा मून यांनी केले प्रमिला आकोडे, विमल घनमोडे यांनी सहकार्य केले.

महिला सक्षमीकरण, अंधश्रद्धा निर्मूलन आणि संविधानिक हक्कांवर होणार चिंतन

# 14 फेब्रुवारीला राज्यस्तरीय महिला परिषद

**नागपूर :** पुरोगामी प्रबोधन चळवळ अंतर्गत महिला संघटन समितीच्या वतीने येत्या शनिवार, दि.14 फेब्रुवारी रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, उर्वेला कॉलनी, नागपूर येथे राज्यस्तरीय महिला परिषद आयोजित करण्यात आली आहे. शतकानुशतके स्त्रियांवर होत असलेल्या अन्याय-अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर स्त्री सक्षमीकरण, सामाजिक न्याय आणि वैचारिक प्रगल्भता या विषयांवर सखोल चिंतन करण्यासाठी या परिषदेचे आयोजन केले आहे.

आजही स्त्रियांना समानतेचा दर्जा केवळ कागदोपत्रीच मिळालेला दिसतो. पुरुषसत्ताक व्यवस्थेमुळे स्त्रियांना दुय्यम वागणूक दिली जाते. या परिस्थितीत बदल घडवण्यासाठी स्त्रीने चूल आणि मूल यांच्या पलीकडेही स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करणे आवश्यक आहे. प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून महिलांनी आपला ठसा उमटवावा, हा आत्मविश्वास जागृत करण्यासाठी ही परिषद महत्वपूर्ण ठरणार आहे.

या परिषदेच्या उद्घाटक म्हणून नीता होले (महात्मा फुले यांचे वंशज, पुणे) उपस्थित राहणार आहेत. परिषदेच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध लेखिका अरुणा सबाने असतील. प्रमुख अतिथी प्राचार्य संध्या राजुरकर (निवासी संपादक, बहुजन सौरभ), प्रमोदिनी रामटेके (आंबेडकरी आंदोलन, यवतमाळ) व सारिका मुकदम (वर्धा) उपस्थित राहणार आहेत.

परिषदेत विविध विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. ‘महिलांमध्ये वाढती अंधश्रद्धा’ या विषयावर अंनिस कार्यकर्त्या माधुरी झाडे (वर्धा) आपले विचार मांडतील.

‘संविधानाने महिलांना काय दिले?’ या विषयावर अॅड. सचिन मेकाले माहिती देतील.

‘महिलांसाठी सरकारची आर्थिक धोरणे’ या विषयावर यशस्वी उद्योजिका शुभांगी मालखेडे (यवतमाळ) मार्गदर्शन करतील. तसेच या परिषदेत प्रणिती डंबारे (वर्धा) यांचा ‘निर्धार’ हा एकपात्री नाट्यप्रयोग सादर होणार आहे. महिला जागृती संघ निर्माण करण्याचा प्रस्ताव राजकुमार दिघडे (सचिव, पुरोगामी प्रबोधन चळवळ) मांडणार आहेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्योत्स्ना बनसोड, संचालन प्रा. शेषराव मेश्राम व प्रतिभा खोब्रागडे, पाहुण्यांचा परिचय प्रा. अंकुश वाकडे, तर आभार प्रदर्शन शिल्पा मकेश्वर करणार आहेत.

या कार्यक्रमास साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे बहुउद्देशीय संस्था (हिंगणा), मुस्लिम महिला मंच (ताजबाग), पँथर महिला संघटन (शताब्दी नगर), राष्ट्रीय चर्मकार महासंघ (भगवान नगर), अखिल भारतीय जनवादी महिला संघटन (मानेवाडा), अभिमान महिला अर्बन बँक (हनुमान नगर), रमाई महिला मंडळ (बहादुरा फाटा), भटके विमुक्त आदिवासी संयोजन समिती (नागपूर) आदी अनेक संघटनांचे सहआयोजन लाभले आहे.

या परिषदेमध्ये बहुजन समाजातील जास्तीत जास्त महिला व नागरिकांनी उपस्थित राहून महात्मा फुले यांच्या वंशजांचे तसेच इतर मान्यवरांचे मार्गदर्शन घ्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# राहुल बुद्ध विहारामध्ये रमाई जयंती साजरी



**नागपूर :** नवीन नरसाळा रोड स्वागतनगर मधील राहुल बुद्ध विहारांमध्ये, रमाई जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. रमाई जयंती साजरी करण्याकरिता स्वागत नगर मधिल महिला उपस्थित होत्या. शिल्पा टवळे यांनी रमाई व डॉ. बाबासाहेब यांच्या जीवनातील प्रसंग सांगितले. त्या म्हणाल्या माता रमाई म्हणजे एका उदात्त समर्पणाची आदर्श सहचारिणी, शालीनतेची विनम्रतेची मूर्ती आणि अथांग करण्याची सावली आणि डॉ. बाबासाहेब म्हणजे मरणावर मात करणारा महामेरू असे दोघांच्याही जीवनातील उदाहरणे सांगून आपणही रमा भिमाचा आदर्श घेतला पाहिजे, तर सुनंदा रायपुरे यांनी डॉ. बाबासाहेबांनी दीक्षा देऊन 69-70 वर्षे झाली, आम्ही डॉ. बाबासाहेबांच्या संकल्पनेतील सशक्त समाज निर्माण करू शकलो नाही. महिला आजही अंधश्रद्धा बाळगतात. जुन्या रुढी, परंपरा पाळतात. त्या आजही सोडायला तयार नाही अशी खंत व्यक्त केली. राहुल बुद्ध विहारामधील रमाई महिला मंडळाच्या विश्रांती भोयर, सुनीता बागडे, पपीता पिल्लेवान, इंदिराबाई खैरे, स्वाती शंभरकर, सविता पाणतावने, रंजना शेंडे, जयवंता खोब्रागडे, सुरेखा बेले, शोभा पाटील, लता मांडवकर व इतर अजूनही बऱ्याचशा महिला विहारामध्ये विविध कार्यक्रम राबवीत असतात. शेवटी रमाईमुळे आम्ही धन्य झालोत अशी कृतज्ञता सर्वांनी व्यक्त केली व सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपन्न झाला.

# समता सैनिक दलाच्या वतीने संविधान चौक इथे नारे निदर्शने



**नागपूर :** गेल्या वीस वर्षांपासून समता सैनिक दलाचे प्रदीप गायकवाड, शेखर गायकवाड हे बजेट मधे वाटा व वाट्यासाठी कायदा व्हावा म्हणून सातत्याने प्रयत्नशील आहेत.

त्याच अनुषंगाने मंगळवार दि. 10 फेब्रुवारीला मार्शल नागसेन बडगे यांच्या नेतृत्वात संविधान चौक इथे नारे निदर्शने करण्यात आले.

वार्ताहरांशी बोलतांना त्यांनी सांगितले की, गेल्या वीस वर्षापासून समता सैनिक दलाच्या वतीने सारखी मागणी करण्यात येत आहे की, महाराष्ट्र बौद्ध, अनुसूचित, अनुसूचित जमाती, विमुक्त भटके यांची टक्केवारी 33.5 इतकी आहे. 1980 च्या दशकात भारतात अनुसूचित जातीवरील अत्याचारांचे प्रचंड वाढ झाली. देशपातळीवर याची कारणे शोधली गेली असता दोन बाबी निदर्शनात आल्या. पहिली जातीय भेदभाव व दुसरी केंद्र व राज्य सरकारने अर्थसंकल्पात केलेला भेदभाव पागे समितीनुसार महाराष्ट्राच्या व केंद्राच्या बजेटमध्ये अनुसूचित जाती-जमाती विमुक्त भटक्या जातीसाठी अर्थसंकल्पात पंधरा टक्के वाटा देण्यात यावे. परंतु आजही तो वाटा देण्यात आला नाही. म्हणून हे नारेनिदर्शनाचे आंदोलन करण्यात आले व जिल्हाधिकारीला भेटून अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त भटके यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात बजेटमध्ये वाटा व वाटा करिता कायदा सुनिश्चित करणे, अनुसूचित जाती जमातींना बजेटमध्ये मिळालेली निधी इतरत्र वळविणे बंद करणे. विद्यार्थ्यांची फी माफी व शिष्यवृत्ती योजना अगक्रमाने राबविणे, विशेष खाजगी व विना अनुदानित उच्च शिक्षण संस्थांमध्ये फी माफी व शिष्यवृत्ती योजना काटेकोरपणे राबविणे. बालकांच्या शिक्षणाच्या अधिकारांची आरटीई व्याप्ती वर्ग बारावीपर्यंत वाढविणे, विद्यापीठे व उच्च शिक्षण संस्था यामधील मागासवर्गीयावर होणाऱ्या अत्याचारांना पायबंद बसण्यास व प्रभावी यूजीसी कायदा लागू करणे. तहसील जिल्हा व शहरांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यावसायिक संकुल उभारणे व अनुसूचित जातीच्या युवकांना स्वयंरोजगार करिता जागा उपलब्ध करून देणे. रमाई घरकुल योजनेचा नियतव्यय पाच लक्ष इतका वाढविणे, महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जाती जमातीमधील दारिद्र्य निरक्षता बेरोजगारी गृहविहिता भूमिहिंता व अल्पभूधारकात स्पष्ट करणारे अहवाल दरवर्षी सादर करण्यास सामाजिक दायित्व कायदा पारित करावा, अनुसूचित जाती जमातीची इतर समूहाच्या तुलनेत असलेली सापेक्ष विषमता स्पष्ट करणारा अहवाल सरकारने दरवर्षी सादर करावा. या उपरोक्त वरील आठ मागण्या जिल्हाधिकारी यांना भेटून मागण्यात आल्या जर लवकरच या मागण्या पूर्ण झाल्या नाही तर वर्षभर वेगवेगळ्या ठिकाणी नारे निदर्शने करून तीव्र संवैधानिक मार्गाने आंदोलने करण्याचा शासनाला इशारा देण्यात आला.

आंदोलनात अॅडवोकेट गुणरत्न रामटेके, राहुल तामगाडगे, संजय फुलझेले, प्रतिभा कोचे, चंचला मुरारकर, आरती गायकवाड, अनिता बडोले, रवी भगत, अनिल गरडकर, गौतम फुललेले, स्मिता बडगे, किरण पाटील, शुभांगी लामसोंगे, सोनाली गजभिये यांच्या समवेत शेकडो समता सैनिक दलाचे कार्यकर्ते उपस्थित होते

# रमाईमुळे डॉ. बाबासाहेब घडले - विजय सावरबांधे




**पवनी :** माता रमाईचा त्याग, हिम्मत व अखंड साथ यामुळे डॉ. बाबासाहेबांना देशातील बहुजनांचा उद्धार करता आला. त्यांना विश्वभूषण बनविण्यात रमाईचे मोठे योगदान आहे असे सांगून रमाईमूळे डॉ. बाबासाहेब घडले असे प्रतिपादन राष्ट्रवादी कांग्रेसचे तालुकाध्यक्ष विजय सावरबांधे यांनी केले. ते मोहरी(चौ) येथे आयोजित त्रिदिवसीय माता रमाई जयंती उत्सव समारोहाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. प्रज्ञा, शील, करुणा बहुउद्देशीय सामाजिक संस्था, गट ग्रामपंचायत व समस्त ग्रामवासी मोहरी ता. पवनी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 5 फेब्रुवारी रोजी त्रिदिवसीय कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्‌घाटक शैलेश मयूर तर अध्यक्ष म्हणून विजय सावरबांधे होते. प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती माजी सभापती सुनील जीवनतारे, पंचायत समिती सदस्य चंद्रशेखर पडोळे, संपादक मनोहर मेश्राम, सितकुर गेडाम, मधुकर जांगळे, अशोक गभने, मोहन लांजेवार, दिलीप सावरबांधे इत्यादी उपस्थित होते.

विजय सावरबांधे पुढे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा उच्च शिक्षणासाठी विदेशात गेले तेव्हा रमाबाईंनी अत्यंत कठीण परिस्थितीत संसार सांभाळला. शेणी-गोवऱ्या वेचून प्रसंगी उपाशी राहून संसाराचा गाडा हाकला. पण डॉ. बाबासाहेबांच्या ध्येयात कधीही अडथळा येऊ दिला नाही. चार मुले दगावल्याचा दुःखद प्रसंग त्यांनी एकटीने सोसला असे सांगून माता रमाईचा त्याग आजच्या महिलांनी स्मरणात ठेवावा असेही म्हणाले. कार्यक्रमाचे उदघाटक सामाजिक कार्यकर्ते शैलेश मयूर यांनी डॉ. बाबासाहेबांच्या सामाजिक चळवळीत त्या केवळ पत्नी नव्हत्या तर एक भक्कम आधारस्तंभ होत्या. त्यांच्यामुळेच डॉ. बाबासाहेब बहुजनांच्या उद्धारासाठी व देशहितासाठी काम करू शकले असे सांगून प्रत्येकांनी त्यांची प्रेरणा घ्यावी असे म्हटले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांची समयोचित भाषणे झालीत. कार्यक्रमाचे संचालन एसटी वाहक बन्सोड यांनी केले. दि. 5 फेब्रुवारीपासून सुरू झालेला जयंती उत्सव 7 तारखेपर्यंत चालणार असून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान सांस्कृतिक कार्यक्रम, मोफत नेत्र तपासणी शिबीर, संगीतमय समाज प्रबोधन, बुद्ध-भीम गीतांचा संगीतमय कार्यक्रम आयोजित केला आहे.



## बसपाने साजरी केली रमाई जयंती

**नागपूर :** भीमरावांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर बनविणाऱ्या व त्यांच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या त्यांच्या जीवनसाथी रमाई यांची 128 वी जयंती बसपाच्या वतीने साजरी करण्यात आली. भीमरावांना डॉ. बाबासाहेब बनवण्यासाठी स्वतः रमाईंनी अत्यंत परिश्रम केले. त्यामुळे भीमराव हे डॉ. बाबासाहेब बनले असे उद्गार बसपा नेते उत्तम शेवडे व रंजना ढोरे यांनी काढले.

‘कही हम भूल ना जाये’ या बसपाच्या राष्ट्रीय अभियानांतर्गत आज बहुजन हिताय बुद्ध विहार यादव नगर येथील रमाई उद्यानातील मातोश्री रमाई यांच्या पुतळ्याला बसपा प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, रंजना ढोरे, जितेंद्र घोडेस्वार, मोहम्मद इब्राहिम टेलर, वैशाली नारनवरे, गौतम पाटील, बहुजन हिताय बुद्ध विहाराचे उत्तमराव चहांदे, कांता मेश्राम, शीला भिवगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत माल्यार्पण करून अभिवादन केले.

# त्यागमूर्ती माता रमाई जयंती साजरी



**नागपूर :** बोधिसत्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात माता रमाई यांचा अर्धाकृती पुतळा उभारण्यात आला असून, जयंतीनिमित्त मोठ्या संख्येने बौद्ध उपासक-उपासिका, स्थानिक नागरिक व दुकानदारांनी माता रमाई तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केले. रिपाईचे नेते बाळू घरडे व बसपा नेते महेश सहारे यांच्या प्रमुख उपस्थितीत मल्यार्पण करण्यात आले. यावेळी वक्त्यांनी माता रमाई यांच्या त्यागमय जीवनाचा उल्लेख करत, त्यांच्या संघर्षातून नव्या पिढीने प्रेरणा घ्यावी आणि समाजाच्या आमूलाग्र परिवर्तनासाठी त्यांच्या आदर्शांचे अनुकरण करावे, असे मत व्यक्त केले.कार्यक्रमादरम्यान शासन-प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे महापुरुषांच्या पुतळ्यांची होणारी अवहेलना, परिसरातील अतिक्रमण व समाजकंटकांचा वावर याबाबतही चिंता व्यक्त करण्यात आली. प्रबुद्ध जनतेने कुणावरही अवलंबून न राहता आपल्या श्रद्धास्थानांची सुरक्षा व संवर्धन स्वतः करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.याप्रसंगी बाळू घरडे, महेश म्हात्रे, राहुल मेश्राम, तेजू पानतावने, रोशन ढवळे, नंदू मेश्राम, अरविंद भालेराव, सरोज मेश्राम, कमलेश सहारे, कुमारी उल्का, शोभा घरडे तसेच परिसरातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शांतीनगरमध्ये मातोश्री रमाई जयंती साजरी



**नागपूर :** भारतीय बौद्ध महासभा शांतीनगर शाखेतर्फे आंबेडकर चौक येथे पंचकमेटी बौद्ध विहारात मातोश्री रमाबाई आंबेडकर यांचा 128 वा जन्मदिवस साजरा करण्यात आला. शिवनाथ नागदिवे यांनी रमाईच्या फोटोला माल्यार्पण करून अभिवादन केले. नागदिवे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उच्च शिक्षण घेण्यासाठी विदेशात गेले असता रमाईनी गरिबीत आपला परिवार सांभाळून डॉ. बाबासाहेबांना पैसे पाठवित होत्या आणि त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. त्यामागे रमाबाईचा मोठा त्याग होता, म्हणूनच त्यांना ‘त्यागमुर्ती रमाई’ असे संबोधले जाते. असेही याप्रसंगी नागदिवे यांनी सांगितले. संचालन डॉ. बीना नगरारे यांनी केले तर आभार नागसेन मेश्राम यांनी मानले. यावेळी भारतीय बौद्ध महासभाचे हरिचंद्र वासनिक, युवराज मडामे, दिलीप महाजन, श्रीकृष्ण मेश्राम, शकुंतला पाटिल, सुनीता बन्सोड, अनिल खोब्रागडे, कृष्णा बोरकर, राष्ट्रपाल गजभिये, अहिल्या नागदिवे, कला पाटील, रवि मेश्राम इत्यादी उपस्थित होते.

# बार्टीच्या वतीने वणंद येथे माता रमाई आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी



**पुणे :** ‘बार्टी’चे महासंचालक सुनील वारे, निबंधक विशाल लोंढे, विस्तार व सेवा, प्रसिद्धी विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर व मातोश्री रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. जयंती महोत्सवाचे औचित्य साधून नागरिकांसाठी सवलतीच्या दरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व इतर महापुरुषांचे मौल्यवान ग्रंथ, पुस्तके अनुयायांना उपलब्ध करून देण्यात आली होती, या पुस्तक विक्री दालनाचे उद्घाटन भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे सरचिटणीस एस. के. भंडारे यांची उपस्थिती होती. ‘मी रमाई बोलते’ या एकपात्री प्रयोगातून प्रेरणा खरात यांनी माता रमाईंचा संघर्षमय जीवनप्रवास जिवंत केला. यावेळी अनेकांच्या डोळ्यात अश्रू वाहिले. त्यानंतर शाहीर शाहिद खेरटकर आणि त्यांच्या संचाने ‘क्रांतीची पाऊले’ या संविधान व भीमगीतांच्या कार्यक्रमातून उपस्थितांमध्ये चैतन्य निर्माण केले. यावेळी बोलताना भीमराव आंबेडकर यांनी रमाईच्या कार्यावर प्रकाश टाकला व बार्टीच्या विविध उपक्रमाचे कौतुक केले. प्रारंभी विभागप्रमुख डॉ. बबन जोगदंड यांनी प्रास्ताविक करतांना बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे यांच्या मार्गदर्शनाखाली बार्टी रमाईच्या कार्याचा गौरव करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून रमाईच्या संघर्षमय जिवनातील अनेक घटनांचे संशोधन करण्यासाठी संशोधन प्रकल्प हाती घेतल्याचे सांगितले.

या प्रसंगी भन्ते सुमेध बोधी, भंते कौडिण्य, भंते सारिपुत्र, भंते आनंद, भंते प्रज्ञाज्योती, रत्नागिरीचे अतिरिक्त पोलीस अधिक्षक बाबुराव महामुनी, दापोलिचे पोलीस निरीक्षक तोरसकर, सरपंच संजना दैवघरकर, पोलिस पाटील सोनाली काटे, बार्टीचे प्रकल्प व्यवस्थापक सुमेध, थोरात, विकास गायकवाड, धिरज खाडे, उषा भिंगारे, जागृती गायकवाड, ज्योती झांजरे, माधुरी सोनवणे, राजर्षी कांबळे, रामदास लोखंडे, राहुल कवडे, प्रियदर्शनी माने, पूजा वायदंडे, माहेश्वरी विचारे, धनश्री अवसरे, सुश्मिता वाघमारे, गौरी सोनवणे, अमीर मुलानी, आकाश कुऱ्हाडे कमलेश कुटे, अक्षय ढमाले, शंकर माने, अशोक साबळे, भिसे, चेतन ढवळे, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्याचे, समतादूत तसेच वनंद गावातील वनंदकर भावकी मधून दीपक धोत्रे, अतिष धोत्रे, सुभाष धोत्रे, संजय धोत्रे, संतोष धोत्रे, प्रज्ञा कांबळे, भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, समता सैनिक दलाचे सैनिक, बार्टीचे कर्मचारी अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. **RNI No. MAHMAR 2020/84035** Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648